# आशेचे ढग

गेल्या वर्षात दुष्काळी स्थितीचा सामना करावा लागलेल्या देशाला या वर्षी चांगल्या पावसाचे आशेचे ढग दिसायला लागले आहेत. भूगर्भातील पाण्याची घटलेली पाण्याची पातळी, धरणांची खपाटीला गेलेली पोटे, नद्या कोरड्याठाक, विहिरींनी तळ गाठलेला अशा परिस्थितीत भारनियमाचे भूत मानगुटीवर बसलेले. अंगाची लाही लाही होणाऱ्या या काळात एक सुखाची झुळूक यावी, तसे झाले आहे. स्कायमेट नावाची खासगी संस्था, पंजाबराव डख आणि आता भारतीय हवामान विभागाने या वर्षी चांगल्या पावसाचा अंदाज व्यक्त केल्याने केवळ शेतकऱ्यांनाच आनंद होणार आहे, असे नाही, तर रिझर्व्ह बँक आणि सरकारलाही सुटकेचा निश्वास टाकल्यासारखे झाले आहे. गेल्या वर्षभरात पाऊस कमी असल्याने त्याचा शेती उत्पादनावर, अर्थव्यवस्थेवर, आयात-निर्यातीवर आणि एकूणच बाजारातील मागणी-पुरवठ्यावर कसा आणि किती परिणाम झाला, हे अनुभवायला मिळते आहे. ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर आणि वस्तूंच्या मागणीतील घट हे कमी पावसाचे कारण आहे. कमी पावसाचा परिणाम जीवनावश्यक वस्तूंच्या उपलब्धतेवर आणि महागाईवर होत आहे. सरकार आणि रिझर्व्ह बँक बाजारात हस्तक्षेप करून महागाई नियंत्रणाला प्राधान्य देत असले, तरी त्याचा पावसाशी संबंध असतो. पाऊस नसला, तर शेतीमालाच्या उत्पादनावर आणि एकूणच ग्रामीण अर्थकारणावर परिणाम होत असतो. या वर्षी ग्रामीण भागात ग्राहकोपयोगी वस्तूंच्या किंमतीत झालेली घट हे त्याचे कारण आहे. सरकारला टँकर, चारा, कर्ज वसुलीत सवलत आदींची उपाययोजना करावी लागली. बँका, पतसंस्थांच्या वसुलीवर परिणाम झाला. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या. कर्जाचा डोंगर वाढतच चालला. अशा परिस्थितीत भारतातील ऐंशी टक्के सिंचन व्यवस्था ज्या मोसमी पावसावर अवलंबून असते, त्याच्याकडे नजरा लागल्या नाहीत, तरच नवल. शेतकरी हा कायम आशेवर जगत असतो. पाऊस जरी जूनच्या मध्यावर सर्वदूर पोचत असला, तरी त्याचे वेध हे फेब्रुवारीच्या मध्यापासून लागलेले असतात. वेगवेगळ्या हवामान संस्था जसे फेब्रुवारीत जसा पहिला अंदाज व्यक्त करतात, तसाच अंदाज वेगवेगळ्या ठिकाणच्या भाकणुकीतून व्यक्त केला जात असतो. त्यातही बुलडाणा, आदमपूरच्या भाकणुकीकडे सर्वांचे लक्ष लागलेले असते. एप्रिलमध्ये भारतीय हवामान विभाग, स्कायमेट आणि अन्य हवामानतज्ज्ञांचा दीर्घकालीन अभ्यासावर आधारित अंदाज व्यक्त होत असतो. असे असले, तरी हा अंदाज असतो. सरासरीपेक्षा जास्त पाऊस होणार असला, तरी तो किती काळात होणार आहे, त्याचे दिवस किती असतील, दोन पावसांत अंतर किती असेल, यावर शेतीची गणिते अवलंबून असतात.

भारतीय हवामान विभागाने व्यक्त केलेल्या दीर्घकालीन हवामान अंदाजानुसार यंदा संपूर्ण देशभरात नैऋत्य मान्सूनच्या काळात सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. सरासरीपेक्षा जास्त म्हणजे १०६ टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे. 'एल निनो' आणि 'ला निना'मुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा अंदाज घेऊन हवामान विभागाने हे दीर्घकालीन अंदाज जाहीर केले आहेत. 'एल निनो' कमकुवत होत असून, 'ला निना' येत असल्याने त्याचा सकारात्मक परिणाम पावसावर होणार आहे. हवामान विभागाकडे असलेल्या जवळपास ७० वर्षांच्या आकडेवारीचा सविस्तरपणे अभ्यास करून चांगल्या पावसाच्या अंदाजाच्या निष्कर्षापर्यंत भारतीय हवामान विभाग पोचला असला, तरी शेवटी हवामानात अचानक बदल होत असतो, वादळे येत असतात आणि जगात कुठेही कमी दाबाचा पट्टा तयार झाला, तर पावसाळी ढग खेचले जाऊन त्याचा परिणाम पावसावर होत असतो. यंदाच्या अंदाजानुसार देशातील बहुतांश भागात म्हणजे जवळपास ७५ टक्क्यांपेक्षा अधिक भागामध्ये चांगल्या पावसाची शक्यता आहे. उत्तर, ईशान्य आणि पूर्वेतील काही राज्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता आहे. देशभरात सरासरीपेक्षा जास्त म्हणजे १०६ टक्के इतका पाऊस पडण्याची शक्यता आहे. जून ते सप्टेंबर या दरम्यानच्या नैऋत्य मान्सून काळातील पावसाचा हा अंदाज आहे. वर्तवलेल्या अंदाजापेक्षा ५ टक्के कमी किंवा जास्त प्रमाणात पाऊस होऊ शकतो. ही शक्यता गृहीत धरली, तरी सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडणार असल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळेल. आजवरच्या पावसाच्या आकडेवारीचा अभ्यास करून ५ जून ते ३० सप्टेंबरदरम्यान सरासरी ८७ सेंमी मीटर पाऊस होत असतो. जेव्हा या ८७ टक्क्यांच्या ९६ ते १०४ टक्के पाऊस पडत असतो, त्याला सरासरी पाऊस म्हणतात. त्यापेक्षा जास्त म्हणजे सरासरीपेक्षा जास्त पाऊस असतो, तर ९० टक्क्यांपेक्षा कमी म्हणजे सरासरीपेक्षा कमी पाऊस असतो. या वर्षी देशात ८७ सेंटीमीटरच्या १०६ टक्के पाऊस पडू शकतो. 'एल निनो' आणि 'ला निना' या हवामानाच्या परिस्थिती आणि त्याच्या प्रभावाचा विचार करून यंदाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. सध्या 'एल निनो'ची स्थिती काहीशी जास्त (मॉडरेट) आहे; पण त्याचा प्रभाव हळू-हळू कमी होत आहे. मॉन्सून सुरू होईप्रर्यंत तो अगदी कमी (न्यूट्रल) स्थितीला येऊ शकतो. तेव्हापासून म्हणजे ऑगस्ट-सप्टेंबरच्या आसपास 'ला निना' स्थिती निर्माण होऊ शकते. 'एल निनो'चा मॉन्सूनवर नकारात्मक परिणाम होत असला, तरी 'ला निना'च्या स्थितीचा पावसावर सकारात्मक परिणाम होतो. हवामान विभागाने १९५१ पासून २०२३ पर्यंत कोणत्या वर्षी 'ला निना'ची स्थिती होती याचा अभ्यास केला. त्यात २२ वर्षे 'ला निना'ची स्थिती होती. त्यापैकी बहुतांश वर्षी पावसाचे प्रमाण हे सरासरी, सरासरीपेक्षा जास्त किंवा अतिवृष्टी झाल्याचे दिसून आले. त्यात अपवाद फक्त १९७४ आणि २००० चा होता. त्या वर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला. 'एल निनो'चा प्रभाव कमी होत असतानाच, 'ला निनो'चा प्रभाव वाढत जातो, तेव्हा समाधानकारक पाऊस होतो.

या वर्षी ईशान्येला किंवा जम्मू काश्मीर, लडाख, हिमाचल, उत्तराखंडमध्ये सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता आहे. ओडिशा, छत्तीसगड झारखंडचा काही भाग, पश्चिम बंगाल इथेही सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता आहे. गेल्या वर्षीपर्यंत नोव्हेंबर ते मार्च दरम्यान महाराष्ट्रात अनेक ठिकाणी गारपीट व्हायची; पण या वर्षी तसे न घडता एप्रिल महिन्यात गारपीट झाली आणि येत्या काही दिवसांतही गारपीट होऊ शकते. हे 'एल निनो' आणि 'ला निना' यांच्या बदलत्या स्थितीचेच संकेत आहेत. या संपूर्ण स्थितीचा विचार करता महाराष्ट्रात यंदा मॉन्सूनच्या पावसाबरोबरच मॉन्सूनपूर्व आणि परतीचा पाऊसही चांगला होण्याची शक्यता आहे. 'एल-निनो' ही प्रशांत महासागरात तयार होणारी एक वातावरणीय स्थिती आहे. प्रशांत महासागराच्या पाण्याचे तापमान जेव्हा नेहमीपेक्षा जास्त वाढते, तेव्हा त्या स्थितीला 'एल-निनो' असे संबोधले जाते. प्रशांत महासागरातील पाण्याचं तापमान साधारणपणे २६ ते २७ अंश सेल्सिअसपर्यंत राहते. त्यात आणखी जास्त वाढ होऊन ते ३२ ते ३४ अंश सेल्सिअसपर्यंत होऊ शकते, या स्थितीला सुपर 'एल निनो' म्हणतात.वारे वेगाने वाहू लागल्यामुळे समुद्राच्या पाण्याचे तापमान वेगाने कमी होऊ लागते. त्या स्थितीला 'ला निना' असे म्हटले जाते. या दोन्ही परिस्थितींचा जगभरातील हवामान किंवा प्रामुख्याने तापमानावर परिणाम होत असतो. राज्यात गेल्या दोन-तीन दिवसात अनेक भागांमध्ये अवकाळी पावसाची हजेरी पाहायला मिळाली. हा पूर्वमोसमी पाऊस मात्र शेतकऱ्यांची डोकेदुखी वाढवत आहे. उन्हाळ्यात जर पाऊस झाला तर पावसाळ्यात कमी पाऊस होईल अशी भीती शेतकऱ्यांना आहे; परंतु ही भीती निराधार ठरवणारा अंदाज वेगवेगळ्या संस्थांनी दिला आहे. विशेष बाब म्हणजे 'स्कायमेट' या संस्थेने 'इंडियन ओशियन डायपोल'सुद्धा यंदा पॉजिटीव्ह राहणार अशी शक्यता वर्तवली आहे. जेव्हा 'इंडियन ओशियन डायपोल' सकारात्मक किंवा पॉझिटिव्ह राहतो, त्या वर्षी नेहमीच चांगला पाऊस होत असतो. दरम्यान, यंदा अशीच परिस्थिती राहणार आहे.यामुळे मॉन्सूनला याचा फायदा होऊ शकेल. ज्येष्ठ हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी या वर्षी मॉन्सूनचा पहिला पाऊस केव्हा बरसणार, मॉन्सूनला केव्हा सुरवात होणार या संदर्भात मोठी माहिती दिली आहे. यंदा २१ मे रोजी मॉन्सून अंदमान निकोबारमध्ये पोहोचण्याची दाट शक्यता आहे. राज्यात जूनच्या पहिल्या आठवड्यात मॉन्सून येणार आहे आणि आपल्या महाराष्ट्रात जूनच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत पेरणीयोग्य पाऊस झालेला असेल, असे डख यांनी म्हटले आहे. उत्तर गोलार्धात युरेशियातील बर्फाच्छादन मागील तीन महिन्यात सरासरीपेक्षा कमी आहे. हिवाळा आणि वसंत ऋतूतील युरेशियातील बर्फाच्छान आणि मॉन्सूनमधील पाऊस यांच्यात विषम संबंध आहे. म्हणजेच या भागातील बर्फाच्छादन कमी झाल्यास भारतात मॉन्सून काळात चांगला पाऊस होतो आणि बर्फाच्छादन जास्त असल्यास पाऊस कमी पडतो. सध्या बर्फाच्छादन कमी असल्याने मॉन्सूनसाठी पोषक मानले जाते. हवामान विभागाने जाहीर केलेल्या अंदाजात महाराष्ट्रातील बहुतांश भागात सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यता आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि पश्चिम विदर्भात सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता जास्त आहे. पूर्व विदर्भातसह इतर भागात सरासरीएवढ्या पावसाची शक्यता जास्त आहे. पूर्व विदर्भातील पावसाबाबत या अंदाजामध्ये स्पष्टता नाही. देशाच्या जीडीपीत कृषी क्षेत्राचे योगदान १४ टक्के आहे. या क्षेत्राचे योगदान वाढू शकेल. चांगल्या पावसामुळे महागाई ०.५ टक्के घटेल. रिझर्व्ह बँकेच्या अंदाजानुसार ती ५.३ टक्क्यांहून कमी ४.८ टक्क्यांपर्यंत येऊ शकते. महागाई नियंत्रित राहिली, तर रिझर्व्ह बँक व्याजदर कमी करू शकेल. गृहकर्ज, वाहन कर्जाचे दर कमी होऊ शकतील. देशांतर्गत मागणी वाढेल. त्याचा फायदा एफएमसीजी, फर्टिलायझर, औषधाशी संबंधित कंपन्यांना होईल.

## सांगलीत भाजपला धक्का;

### माजी आमदार विलासराव जगताप यांनी भाजपचा दिला राजीनामा



**सांगली :** सांगली लोकसभा निवडणुकीची सद्या राज्यभर चर्चा आहे, एकीकडे महविकास आघाडीत उमेदवारीसाठी रस्सीखेच सुरू असताना भाजपमध्ये सगळं आलबेल नाही, जतचे भाजपचे माजी आमदार विलासराव जगताप यांनी भाजपच्या सदस्य पदाचा राजीनामा देत, वसंतदादांचे नातू विशाल पाटील यांना पाठींबा जाहीर केला आहे.

सोमवारी जतचे माजी आमदार विलासराव जगताप यांनी आपली भूमिका जाहीर करण्यासाठी मेळावा आयोजित केला होता, या मेळाव्यात त्यांनी ही घोषणा केली. दरम्यान त्यांच्या सोबत माजी मंत्री अजितराव घोरपडे यांनीं संजयकाकांच्या उमेदवारीला विरोध केलेला होता, तसेच खासदार संजय राऊत त्यांना महविकास आघाडीचे वास्तव सांगत विशाल पाटील यांना पाठींबा दिला होता.

भाजप मध्ये खसदार संजयकाका पाटील यांना उमेदवारी मिळताच जत तालुक्यात त्यांच्या विरोधात कार्यकर्ते तयार असल्याचा आरोप करीत विलासराव जगताप यांनी खासदार पाटील यांच्या उमेदवारीला उघड उघड विरोध केला होता. त्यावेळी संजयकाका गटाने त्यांची पक्षातून हकलपट्टी करावी अशी मागणी केली होती, मात्र पक्षाने तशी कारवाई न करता त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला होता.

आमदार विलासराव जगताप यांनी सोमवारी झालेल्या मेळाव्यात विशाल पाटील यांना पाठींबा देत असल्याचे जाहीर केले.

त्यांनी भाजपा सदस्यत्वाचा राजीनामा भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना पाठवला आहे. यामध्ये म्हंटल आहे की , भारतीय जनता पार्टीमध्ये मी, आजपर्यंत पक्षवाढीसाठी काम केले आहे. परंतु पक्षाने त्याची दखल न घेता आलिकडे माझ्या विरोधात गट बांधण्याचे व माझे अवमूल्यन करण्याचे काम वरिष्ठ पातळीवरुन करण्यात आले आहे. ते मला सहन करणे शक्य नाही. त्यामुळे मला स्वतंत्रपणे विचार करण्यासाठी मी पक्षाच्या जबाबदारीतून मुक्त होतो. तरी मी आपल्या भा.ज.पा.पक्षाचा राजीनामा देत आहे.

## सावळजमध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**तासगांव :** सावळज (ता. तासगाव) येथे विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सरपंच मिनलताई पाटिल व उपसरपंच रमेश कांबळे व मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून वंदना घेऊन कार्यक्रमास सुरुवात झाली. या कार्यक्रमात यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांचा सत्कार करण्यात आला. त्याच बरोबर भारत सरकारच्या नोटरी पदी नियुक्ती झालेले ड. मिलिंद धेंडे, व ड.सुरेश पाटील यांचा ही सत्कार करण्यात आला तसेच आंबेडकर जयंती निमित्त आमदार सुमन वहिनी पाटील यांनीही भेट देऊन अभिवादन केले.

कार्यक्रमास विश्वशांती बौद्ध विहारचे अध्यक्ष महावीर धेंडे, आरपीआय तालुका अध्यक्ष प्रवीण धेंडे, ड.विजय धेंडे, मनिष धेंडे, हर्ष धेंडे पवन भिसे, गौतम कांबळे, सुभाष धेंडे, पांडुरंग भिसे, सतिश धेंडे, यासह मोठ्या प्रमाणात बौद्ध बांधव उपस्थित होते.

सूत्रसंचालन साहिल उर्फ राज भिसे यांनी केले. मान्यवरांचे स्वागत मयुर धेंडे यांनी केले तर शेवटी पांडुरंग भिसे आभार मानले.

## प्रचार संपला, १९ एप्रिलला मतदान; प्रशासन सज्ज

### २१ हजारांवर कर्मचारी तैनात




**नागपूर :** लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात नागपूर व रामटेक लोकसभा मतदारसंघासाठी १९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. यासाठीचा प्रचार बुधवारी सायंकाळी ५ वाजता संपला. आता प्रशासन मतदानासाठी सज्ज झाले आहे.निवडणूकशांततेत पार पडावी, यासाठी कडेकोट पोलिस बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे. जिल्हानिवडणूकनिर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी याबाबत बुधवारी सविस्तर माहिती दिली. यावेळी ग्रामीण पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार उपस्थित होते.

-उ्टनकर यांनी सांगितले की, नागपूर आणि रामटेक या दोन्ही लोकसभा मतदारसंघांत एकूण ४,५१० मतदान केंद्रे आहेत. यामध्ये रामटेकमध्ये २,४०५ तर नागपूरमध्ये २,१०५ मतदान केंद्रे राहणार आहेत. जिल्ह्यातील एकूण ४२ लाख ७२ हजार ३६६ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. संपूर्ण मतदान सुरळीत पार पाडण्यासाठी एकूण २१ हजार ६४८ अधिकारी, कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त पोलिसांचा अतिरिक्त बंदोबस्त राहणार आहे.- पोलिंग पार्टी आज रवाना होणार

मतदान केंद्रावर नियुक्त करण्यात आलेल्या पोलिंग पार्टींना गुरुवारी ईव्हीएम बॅलेटसह सर्व साहित्याचे वितरण करण्यात येईल. विधानसभानिहाय तयार करण्यात आलेल्या स्ट्राँगरूम परिसरात या साहित्याचे वितरण दिवसभर चालेल. सर्व पोलिंग पार्टी सायंकाळपर्यंत आपापल्या मतदान केंद्रावर पोहोचतील. मतदानाची व्यवस्था करतील आणि तसा अहवाल सादर करतील.- सकाळी ६ वाजता 'मॉक पोल'

मतदान केंद्रावर सकाळी ६ वाजता 'मॉक पोल' घेण्यात येईल. हे 'मॉक पोल' पोलिंग एजंटच्या उपस्थितीत होईल. ते ७ वाजेपर्यंत चालेल. त्यानंतर मतदानास सुरुवात होईल.- मतदानाची वेळ सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत

मतदानाची वेळ सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत आहे. मतदान केंद्रात ६ वाजेपर्यंत रांगेत असलेल्या प्रत्येक मतदारास मतदान अधिकारी कूपन देतील. ज्यांच्याजवळ कूपन असेल, त्यांचे मतदान होईपर्यंत मतदानाची प्रक्रिया सुरू राहील.- विधानसभानिहाय मतदान केंद्र

**नागपूर लोकसभा**
**नागपूर दक्षिण-पश्चिम - ३७०**
**नागपूर दक्षिण - ३४९**
**नागपूर पूर्व - ३५४**
**नागपूर मध्य - ३०५**
**नागपूर पश्चिम -३३५**
**नागपूर उत्तर - ३९२एकूण - २१०५**
**रामटेक लोकसभा**
**काटोल - ३२८**
**सावनेर - ३६७**
**हिंगणा - ४५८**
**उमरेड - ३८७**
**कामठी - ५०८**
**रामटेक - ३५७**
**एकूण - २४०५**



## विठ्ठलाच्या प्रसादाचे ३ लाख बुंदी, ५० हजार राजगिरा लाडू तयार

**सोलापूर :** श्री विठ्ठल - रुक्मिणी मंदिर समितीकडून भाविकांना श्रीविठ्ठलचा प्रसाद म्हणून अल्पमूल्य देणगी आकारून बुंदी व राजगिरा लाडू प्रसाद उपलब्ध करून देण्यात येतो. चैत्री वारीसाठी ३ लाख बुंदी लाडू प्रसाद व ५० हजार राजगिरा लाडू प्रसाद तयार केल्याची माहिती समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.- ऊत्तएठढखडएचएछ्ढश्रीक्षेत्र पंढरपूर येथे दरवर्षी आषाढी, कार्तिकी, माघी व चैत्री अशा चार प्रमुख यात्रा भरतात. त्यामध्ये तुलनेने संख्यात्मकदृष्ट्या कमी असणारी चैत्री यात्रा शुक्रवार, १९ एप्रिल रोजी होत आहे. या यात्रेला पंढरपूर शहरात सुमारे दोन ते तीन लाख भाविक असतात. त्यामध्ये बुंदी लाडू प्रसाद मंदिर समितीमार्फत आवश्यक कच्चा माल खरेदी करून एमटीडीसी भक्त निवास येथील लाडू उत्पादन केंद्रात तयार केला जातो. तसेच राजगिरा लाडू प्रसाद हा आऊटसोर्सिंग पद्धतीने खरेदी करण्यात येत आहे. वारीला येणारा प्रत्येक भाविक हा लाडू प्रसाद खरेदी करत असतो आणि या भाविकांना पुरेशा प्रमाणात लाडू प्रसाद उपलब्ध व्हावा, असे नियोजन मंदिर समितीमार्फत करण्यात आले आहे.पॅकिंगसाठी पर्यावरणपूरक कागदी पिशव्यांचा वापरश्री विठ्ठल - रूक्मिणी मंदिर परिसरात पश्चिमद्वार व उत्तरद्वार येथे कायमस्वरूपी लाडू स्टॉल उभा करण्यात आले असून, सदरचे स्टॉल सकाळी सहा ते रात्री बारापर्यंत सुरू ठेवण्यात येत आहेत. बुंदी लाडू प्रसादासाठी चांगल्या दर्जाची कोरडी हरभरा डाळ, डबल रिफाइंड शेंगदाणा तेल, बेदाणा, काजू, वेलदोडे, रंग, सुपर एस. साखर इत्यादी घटक पदार्थांचा व पॅकिंगसाठी पर्यावरण पूरक कागदी पिशव्यांचा वापर करण्यात येत आहे. या बुंदी लाडू प्रसादासाठी सुमारे ५० कर्मचारी, स्वयंसेवक सेवा देत आहेत. अन्न व औषध प्रशासनाच्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन करून बुंदीलाडू प्रसादाची निर्मिती करण्यात येत आहे.

## रक्षा खडसेंविरोधात आमचा उमेदवार लाखांच्या मताधिक्याने निवडून येईल; रोहिणी खडसेंनी डिवचलं



**जळगाव :** रावेर लोकसभा मतदारसंघात भाजपकडून पुन्हा एकदा विद्यमान खासदार रक्षा खडसे यांना उमेदवारी देण्यात आली असून त्यांच्याविरोधात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाने श्रीराम पाटील यांना मैदानात उतरवलं आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पक्षाचे नेते आणि विधानपरिषद आमदारएकनाथ खडसेहे लवकरच भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याने भाजपलारावेरमतदारसंघात मदत होणार आहे. मात्रएकनाथ खडसेयांच्या कन्यारोहिणी खडसेया शरद पवारांच्या राष्ट्रवादीतच राहणार असून त्यांनी रावेरची जागा आम्हीच जिंकू, असा विश्वास व्यक्त केला आहे.

गिरीश महाजनांच्या टीकेला प्रत्युत्तर देतानारोहिणी खडसेयांनी म्हटलं आहे की, प्रत्येकाला आपआपल्या पक्षाच्या उमेदवाराच्या बाबतीत बोलण्याचा अधिकार आहे. त्यामुळे गिरीश महाजन यांनी त्यांच्या पक्षाच्या उमेदवाराबद्दल मत व्यक्त करणं काही गैर नाही. मात्र आम्ही हवेत गोळीबार करत नाही. थोड्या दिवसांत तुम्हाला सगळं लक्षात येईल आणि आम्ही लाखांच्या लीडने निवडून येऊ, असा आम्हाला विश्वास आहे. फक्त आता आकडेवारी सांगण्यापेक्षा आम्ही कामावर भर देतोय, आमचे उमेदवार श्रीराम पाटील हे तळागाळापर्यंत पोहोचत आहेत, संपर्क करत आहेत. ते नक्कीच चांगल्या मतांनी निवडून येतील, असा दावा रोहिणी खडसेंनी केला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# शिरोळ तालुक्यात कुरुंदवाड सह शिरोळ शहराचा ग्रामीण भागाला गारपिटीच्या पावसाने झोडपून काढले

## शिरोळ तालुक्यात वळीव पावसाची दमदार हजेरी



**शिरोळ :** शिरोळ तालुक्यात अनेक ठिकाणी बुधवारी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास वळीव पावसाने दमदार हजेरी लावली अचानक आलेल्या पावसाने नागरिकांना सुख:द धक्का दिला शिरोळच्या आठवडी बाजारात व्यापारी भाजी विक्रेते आणि ग्राहकांची तारांबळ उडाली

गेल्या अनेक दिवसापासून हवेत उष्मा अधिक जाणवत होता उष्माने नागरिकांच्या अंगाची लाही लाही होऊन जीव कासावीस होत होता अति उष्म्यामुळे नागरिक हैराण झाले होते त्यामुळे एखादा वळीव पाऊस या परिसरात पडावा अशी अपेक्षा नागरिकांची होती बुधवारी अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांना सुख:द धक्का मिळाला

बुधवारी सकाळपासूनच हवेत उष्मा अधिक जाणवत होता ढगाळ वातावरण असूनही उष्मा अधिक असल्यामुळे दुपारच्या वेळी तर रस्ते अक्षरशा ओस पडले होते सायंकाळी चार नंतर गारपिटाबरोबरच वादळी वाऱ्यासह वळीव पावसाने दमदार हजेरी लावली यामुळे काही काळ हवेत गारवा निर्माण झाला पाऊस झाल्यानंतर पुन्हा हवेत उष्मा निर्माण झाला अचानक आलेल्या पावसामुळे शिरोळ शहरातील श्री बुवाफन मंदिरासमोर भरणाऱ्या आठवडी बाजारातील भाजी विक्रेते व्यापारी ग्राहकांची अक्षरशः तारांबळ उडाली होती पण पाऊस होणे गरजेचे असल्यामुळे पहिल्यांदा पडलेल्या वळीव पावसाचा आनंद सर्वांनी घेतला बालचमुने रस्त्यावर येऊन पावसात भिजत नाचत आलेल्या पावसाचे स्वागत केले अनेक जण पडलेल्या गारा वेचण्यात मग्न झाले होते

आज पडलेला पाऊस हा काही पिकांना पोषक ठरला ऊस मक्का हंगामी भाजीपाला यांना पाऊस पोषक ठरला आहे तर हरभरा ज्वारी गव्हाची मळणी झाली असल्यामुळे शेतकऱ्यांची चिंता मिटली होती.

एप्रिल महिना मध्यावर आला असून नदीपात्र अनेक ठिकाणी कोरडे पडले आहेत अनेक ठिकाणी पाण्याची टंचाई जाणवत होती त्यामुळे पावसाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या सर्व नागरिकांच्याबरोबरच शेतकऱ्यांनी आज पडलेल्या पावसामुळे समाधान व्यक्त केले

दरम्यान कुरुंदवाड सह ग्रामीण भागालाही गारपिटीच्या पावसाने झोडपून काढले आहे अचानक आलेल्या या पावसामुळे अनेक जणांची मोठी तारांबळ उडाली होती ऊस पिकासाठी हा चांगला पाऊस असल्याचे शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे

# अरिहंत'कडून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास दत्त शेतकरी कारखान्याचे अध्यक्ष गणपतराव पाटील यांचे मत

## कुरुंदवाड येथे श्री अरिहंत को-ऑप सोसायटी शाखेचे उद्घाटन

**कुरुंदवाड :** ग्रामीण भागातील सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी सहकारी संघ , सोसायट्यांची गरज असते. हे ओळखून सहकार नेते रावसाहेब पाटील यांनी गेल्या ३४ वर्षापूर्वीच श्री अरिहंत संस्थेची स्थापना करून शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्य केले आहे .आज 'अरिहंत' मुळेच शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासाला चालना मिळत असल्याचे मत शिरोळ येथील दत्त कारखान्याचे चेअरमन श्री गणपतराव पाटील यांनी व्यक्त केले.

श्री अरिहंत को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड बोरगाव (मल्टीस्टेट) या संस्थेच्या कुरुंदवाड येथे शाखेचा विविध मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब पाटील यांनीही मनोगत व्यक्त करताना कर्नाटका बरोबरच महाराष्ट्र राज्यातही शाखा विस्तारीला मंजुरी मिळवून जयसिंगपूर, गडहिंग्लज, सांगली, कुरुंदवाड या ठिकाणी शाखा प्रारंभ केली आहे. लवकरच आदमापूर ,इचलकरंजी, हुपरी या ठिकाणीही शाखांचे उद्घाटन होणार आहेत . अरिहंत सोसायटीच्या माध्यमातून आपण सभासदांसाठी विविध ठेवी योजना हाती घेतले आहे .या विविध योजनांचा लाभ सर्वांनी घ्यावा. विश्वासामुळे सहकार क्षेत्राची प्रगती होत असते आणि हा विश्वास आपण सार्थ ठरविले असल्याने सभासदांचा आपल्या संस्थेवर मोठा विश्वास असल्याचे शेवटी रावसाहेब पाटील यांनी सांगितले.

शाखा उद्घाटनाची औचित्य साधून विविध क्षेत्रातील मान्यवरांनी संस्थेस भेट देऊन शुभेच्छा दिल्या. अनेकांनी विविध ठेव योजनांचा लाभ घेऊन ठेव ठेविले.



श्री अभिजीत पाटील व सौ पद्मारानी पाटील यांच्या हस्ते धार्मिक विधिवत पूजा करण्यात आले.

कार्यक्रमास युवा नेते उत्तम पाटील, कार्याध्यक्ष अभिनंदन पाटील सौ मीनाक्षी पाटील, रावसाहेब पाटील, धनपाल आलासे ,दादासाहेब पाटील, बाळासाहेब देसाई ,जवाहर पाटील ,रामचंद्र मोहिते, रमेश भुजगडे ,अरुण आलासे ,प्रदीप पाटील, हर्षद बागवान ,इंद्रजीत पाटील ,देवराज मगदूम ,बाळासो नाईक, जीनाप्पा भबीरे,शरद आलासे ,अक्षय आलासे, संस्थेचे उपाध्यक्ष सतीश पाटील, सीईओ अशोक बंकापुरे, यांच्यासह सर्व संचालक , मान्यवर उपस्थित होते.

श्री अरिहंत को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड बोरगाव (मल्टीस्टेट) या संस्थेच्या कुरुंदवाड येथे शाखेचा उद्घाटन प्रसंगी दत्त कारखाना शिरोळ चे चेअरमन गणपतराव पाटील यांनी भेट देऊन संस्थेला शुभेच्छा दिल्या .याप्रसंगी संस्थापक अध्यक्ष रावसाहेब पाटील ,युवा नेते उत्तम पाटील ,कार्याध्यक्ष अभिनंदन पाटील, इंद्रजीत पाटील, रावसाहेब पाटील आदी उपस्थित होते.

# शिरटीचे ग्रामदैवत श्री भैरेश्वर मंदिराच्या कलशारोहण व वास्तुशांती सोहळ्याची जय्यत तयारी

**शिरोळ :** शिरटी (ता शिरोळ) येथील जागृत ग्रामदैवत श्री भैरेश्वर मंदिराचे बांधकाम पूर्णत्वास आले आहे .मंदिराचा कलशारोहण व वास्तुशांती सोहळा बुधवार दिनांक २४ ते शुक्रवार दिनांक २६ एप्रिल २०२४अखेर तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. भैरेश्वर मंदिर जीर्णोद्वार समिती,भैरेश्वर युवक यात्रा कमिटी,भाविक व ग्रामस्थांच्यावतीने या सोहळ्याची जय्यत तयारी सुरू आहे.

शिरटी येथील ग्रामदैवत श्री भैरेश्वर मंदिराचा जिर्णोद्धार करण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला होता .या मंदिर जीर्णो द्धार समितीचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा खवाटे ,उपाध्यक्ष सतीश चौगुले, सदस्य प्रकाश उदगावे, धनाजी भोसले, आण्णासाहेब सुतार,अरुण आंबोले, यांच्यासह अन्य कमिटीच्या व ग्रामस्थांच्या सहकार्याने भव्य आणि दिव्य असे मंदिर उभारण्यात आले आहे.

.या मंदिराचा कलशारोहण व वास्तुशांती सोहळ्यानिमित्त तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे सलग तीन दिवस सकाळ संध्याकाळ महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. कलशारोहन सवालामध्ये सर्वाधिक बोली घेतलेल्या व्यक्तिंची हत्ती,घोडे समवेत रथात बसवून मिरवणु काढण्यात येणार आहे.मंदिराभोवती मंडप उभा करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे , मंदिर परिसरात विद्युत रोषणाई, याबरोबर अन्य कामे अंतिम टप्प्यात आली आहे तसेच गावातील सर्व मंदिर मशिदीवरतीही विद्युत रोषणाई करण्यात येत आहे.

बुधवारी दिनांक २४ रोजी मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम नगरप्रदक्षिणा होणार आहे तर गुरुवार दिनांक २५ एप्रिल रोजी वास्तुशांती सोहळा सुहासिनी महिलांचे डोक्यावर कलश घेऊन मिरवणुकीने मंदिरात आगमन होणार आहे, रात्री सोपानकर महाराजांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे तसेच अन्य धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे . तर शुक्रवार दिनांक २६ एप्रिल रोजी होमहवन कलश स्थापना होणार आहे मुख्य गर्भकलश बसिवण्याचा सवालाद्वारे मान सौ व श्री महादेव शंकर भंडारे यांना मिळाला आहे शिखर कलशाचा मान श्रीमती सुरेखा जंबू गणे यांना मिळाला भैरेश्वर मंदिराच्या प्रवेशद्वारावरील मुख्य पाच कलशांमधील धर्मकलशाचा मान सौ व श्री प्रशांत राजगोंडा पाटील यांना मिळाला रक्षा कलशाचा मान सौ व श्री कल्लाप्पा आबा भंडारे याना तर प्रीती कलशाचा मान सौ व श्री नेमगोंडा कलगोंडा पाटील यांना तसेच नल कलशाचा मान सौ व श्री दादा आण्णासो जगावे यांना तर यश कलशाचा मान सौ व श्री बाळासो आबा भंडारे यांना मिळाला आहे

आडीबेनाडी येथील श्री दत्त देवस्थानचे मठाधिपती परमपूज्य परमात्माराज महाराज यांच्या अधिपत्याखाली हा धार्मिक सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी भैरेश्वर जीर्णो द्वार समितीचे सर्व पदाधिकारी ,भैरेश्वर युवक यात्रा कमिटीचे अध्यक्ष निखिल पाटील, उपाध्यक्ष संग्राम शिंदे सरकार, यांच्यासह सर्व पदाधिकारी गावातील सर्व तरुण मंडळ, ग्रामपंचायतीचे आजी-माजी पदाधिकारी,ग्रामस्थ व भाविक परिश्रम घेत आहेत.

# तासगाव, वासुंबे येथे आज पाणीपुरवठा नाही

**तासगाव :** जलशुद्धीकरण केंद्राचे दुरुस्तीचे काम करण्यात येणार असल्याने तासगाव नगरपरिषद व वासुंबे हद्दीत मंगळवार दि. १६ एप्रिल रोजी पाणी पुरवठा होणार नसल्याची माहिती पाणी पुरवठा विभाग प्रमुख राजेंद्र काळे यांनी दिली.

तासगाव नगर परिषदेने नेहमीच तासगाव शहरासह परिसरातील नागरिकांचे हे डोळ्यासमोर ठेवून शहरात पुरेसा व स्वच्छ पाणीपुरवठा केला आहे. हेच सातत्य रहावे हे डोळ्यासमोर ठेवून जलशुद्धीकरण केंद्राचे दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे.भिलवडी जॅकवेल, पाचवा मैल जलशुध्दीकरण केंद्र व लांडघोल मळा जलशुध्दीकरण केंद्र येथील दुरुस्तीची कामे करणेचे नियोजन नगरपरिषदेने केलेले आहे. त्यामुळे तासगांव शहरास व वासुंबे हद्दीमध्ये संध्याकाळी होणारा पाणीपुरवठा पुर्णपणे बंद राहणार आहे.

# संजयकाकांच्या विजयासाठी १४ किमी पायी प्रवास



**तासगाव :** सांगली लोकसभेचे भाजपचे उमेदवार संजय पाटील यांच्या विजयासाठी तासगावच्या गणरायाला साकडे घालण्यात आले आहे. कवलापूरच्या सोमनाथ (आप्पा) घाटगे यांचे चिरंजीव सुदर्शन घाटगे या युवकाने बुधगाव कॉलेज ते तासगाव असा तब्बल १४ किलोमीटरच्या पायी प्रवास करत संजय पाटील यांच्या विजयासाठी गणरायाचे दर्शन घेतले.

सांगली लोकसभेसाठी भाजपकडून संजय पाटील यांना तिसऱ्यांदा संधी मिळाली आहे. या निवडणुकीत विजय मिळवून यावेळी हॅट्रिक करण्याच्या तयारीत ते आहेत. त्यांच्या विजयासाठी कार्यकर्त्यांकडून जीवाचे रान केले जात आहे. जिल्ह्यात निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. संजय पाटील यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. येत्या काही दिवसात ते उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

संजय पाटील यांच्यासमोर सध्या तरी तुल्यबळ उमेदवार नसल्याने त्यांचा एकतर्फी विजय होईल, असा विश्वास कार्यकर्त्यांना आहे. महाविकास आघाडीमध्ये निवडणुकीपूर्वीच धुसफूस सुरू झाली आहे. उमेदवारीवरून सुरू झालेला संघर्ष आता टोकाला गेला आहे. शिवसेनेने (ठाकरे गट) सांगलीची उमेदवारी जाहीर करून काँग्रेसची मोठी कोंडी केली.

त्यामुळे संतप्त झालेल्या विशाल पाटील यांनी स्वतंत्रपणे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तर शिवसेनेकडून डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील हे मैदानात आहेत. निवडणुकीपूर्वीच महाविकास आघाडीमध्ये बिघाडी झाल्याने संजय पाटील यांचा विजय सोपा झाल्याचे बोलले जात आहेत.

एकीकडे संजय पाटील यांच्या विजयासाठी भाजप कार्यकर्त्यांकडून जीवाचे रान केले जात असतानाच, दुसरीकडे कवलापूर येथील सुदर्शन सोमनाथ घाटगे याने बुधगाव कॉलेज ते तासगाव असा तब्बल १४ किलोमीटरचा पायी प्रवास करत तासगावच्या गणरायाला पाटील यांच्या विजयासाठी साकडे घातले. आज सकाळी ६.४५ ते ८.४५ असा तब्बल दोन तास सुदर्शन यांनी हा १४ किलोमीटरचा प्रवास पूर्ण केला. यावेळी तासगाव नगरीत सुदर्शन याचे भाजप कार्यकर्त्यांकडून स्वागत करण्यात आले.

# तासगावातील आत्मा योजनेची चौकशी करून अहवाल तात्काळ द्या

### आत्मा प्रकल्प संचालकांचे तालुका कृषी अधिकाऱ्यांना पत्र, मनसेची होती तक्रार

**तासगाव:** तालुक्यातील कृषी विभागातील आत्मा योजनेत ९० टक्के शेतकरी गट विना संमतीपत्राचे, खाडाखोड व कागदपत्रे संशयास्पद आहेत. यासंबंधी मनसे नेते अमोल काळे यांनी जांबुवंत घोडके आत्मा प्रकल्प संचालक सांगली यांच्याकडे तक्रार करत कारवाईची मागणी केली होती. यावर घोडके यांनी तालुका कृषी अधिकारी यांना पत्र व्यवहार करत पंधरा दिवसात अहवाल द्या असे आदेश दिले आहेत.

दिलेल्या निवेदनात अमोल काळे यांनी सांगितले की, आत्माचे शेतकरी गट नोंदणीचे मस्टर , गटात सहभागी सदस्यांची संख्या, गट नोंदणी प्रस्ताव प्राप्तीचा दिनांक, गट प्रमुखाचे नाव व मोबाईल नंबर ,गट नोंदणीसाठी प्रस्ताव, कृषि कार्यालयास पाठवल्याचे पत्र कमांकाच दिनांक नाही, तसेच गटाचे प्रमाणपत्र प्रस्ताव मिळाल्याची गट प्रमुख व गट प्रतिनिधी यांच्याही सहया नाहीत.

वरील सर्व माहिती माहिती अधिकार द्वारे प्राप्त झालेली आहे.

हा सर्व प्रकार गंभीर स्वरूपाचा असून यासाठी कारणीभूत अधिकाऱ्यावर फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करून योग्य ती व्हावी अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन येईल व त्यावेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास जबाबदार राहील. असा इशारा मनसे नेते अमोल काळे यांनी दिला होता. यावर घोडके यांनी तासगाव तालुका कृषी अधिकारी यांना पत्र व्यवहार करत पंधरा दिवसात अहवाल द्या असे आदेश दिले आहेत.

# जोरदार शक्ती प्रदर्शन करत मंडलिक मानेचे उमेदवारी अर्ज दाखल : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उपस्थिती

*** अर्ज दाखल करण्यासाठी नेत्यांची हजेरी**

*** इतिहासात पहिल्यांदाच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री उमेदवारांच्या सोबत**

*** रामदास कदम, शंभूराजे देसाईची उपस्थिती**

*** बाळासाहेबांचे, मोदीचे स्वप्न साकार करण्याचे मुख्यमंत्र्यांची आव्हान**

कोल्हापूर : कोल्हापूर ,हातकणंगले लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक, धैर्यशील माने यांचा उमेदवारी अर्ज जोरदार शक्ती प्रदर्शन करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत आज दाखल करण्यात आला. यावेळी महायुतीच्या नेत्यांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली होती निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी हा उमेदवारी अर्ज स्वीकारला. यावेळी संपूर्ण जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती.



कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार संजय मंडलिक तसेच हातकणंगलेचे उमेदवार धैर्यशील माने या दोघांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आज मुहूर्त काढला होता. ऐतिहासिक गांधी मैदानात एकत्रित येऊन उमेदवारी अर्ज दाखल करण्याचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी अकरा वाजता या मैदानात कार्यकर्ते, समर्थक मोठ्या प्रमाणात जमा झाले होते. या ठिकाणी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्रीचे आगमन झाल्यावर जोरदार घोषणाबाजी करण्यात आली .त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी मार्गदर्शन केल्यानंतर गांधी मैदानातून शहरातील विविध मार्गवरुन भव्यशक्ती प्रदर्शन करत जिल्हाधिकारी कार्यालयावर उमेदवारासह मुख्यमंत्री दाखल झाले. या ठिकाणी आल्यानंतर निवडक लोकांच्या समवेत उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला.

यावेळी चंद्रकांतदादा पाटील ,खासदार धनंजय महाडिक, माजी खासदार निवेदिता माने, पालकमंत्री हसन मुश्रीफ, राज्य नियोजन मंडळाचे अध्यक्ष राजेश क्षीरसागर , माजी चंद्रदीप नरके, आमदार विनय कोरे, आमदार प्रकाश आवाडे , आमदार राजेद्र पाटील, माजी आमदार अमल महाडिक यांच्यासह महायुतीचे सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गळ्यात शिवसेनेचे भगवे मफलर, भगव्या टोप्या, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे ,धर्मवीर आनंद दिघे, त्याचबरोबर उमेदवार संजय मंडलिक, धैर्यशील माने माजी आमदार राजेश क्षीरसागर यांचे कार्यकर्त्यांच्या हातातील कटआउटस सर्वांचे लक्ष वेधत होते.

कोल्हापूर, हातकणंगले मतदार संघातील उमेदवारांचे अर्ज भरण्यासाठी दस्तूर खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची प्रमुख उपस्थिती असल्याने इतिहासात पहिल्यांदाच मुख्यमंत्री उमेदवारांचे अर्ज भरण्यासाठी आल्याची नोंद या ठिकाणी झाली



# श्रीराम जय राम जय जय रामच्या जयघोषात श्री राम नवमी उत्साहात साजरी

**शिरोळ :** श्रीराम जय राम जय जय रामचा अखंड जयघोष करीत येथील श्रीराम मंदिरात श्री राम नवमी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले श्री राम जन्मोत्सवानंतर उपस्थित भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला

श्रीराम नवमी निमित्त मंदिरात गेल्या अनेक दिवसापासून धार्मिक कार्यक्रमाबरोबरच भजन कीर्तन नामजप असे विविध कार्यक्रम सुरू होते आज मंदिरात पहाटे राम भक्तांच्या उपस्थितीत श्रीराम सीता व लक्ष्मणाच्या मूर्तीस महाअभिषेक व पूजा करण्यात आली यानंतर ह भ प महेश कळेकर यांचे किर्तन झाले किर्तन सोहळा संपन्न झाल्यानंतर श्रीराम जन्मोत्सव काळ पार पडला जय श्रीराम श्रीराम जय राम जय जय रामचा जयघोष करीत श्रीराम भक्तांनी पुष्पवृष्टी करत मंदिरात दर्शन घेतले मंदिरात उपस्थित असणाऱ्या भाविकांना सुंठवड्याचे वाटप करण्यात आले यानंतर सर्व भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला यानंतर दुपारी महिला भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम झाला सायंकाळी पाच वाजता शहरातील प्रमुख मार्गावरून श्रीराम पालखी प्रदक्षिणा टाळ मृदुंगाच्या गजरात काढण्यात आली यावेळी रस्त्यावर सडा रांगोळी करून पालखीचे स्वागत करण्यात आले

श्रीराम मंदिरातील वारकरी सांप्रदाय आणि येथील राजा शिवछत्रपती तरुण मंडळाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी महाप्रसादाचे आयोजन केले होते येथील छत्रपती शाहू विद्यामंदिर व कन्या विद्या मंदिर या शाळेच्या आवारात आयोजित केलेल्या महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला

जयसिंगपूर येथील मानधना परिवार विठ्ठल भाट राहुल यादव दिलीपराव माने चंद्रकांत भाट बाळासाहेब कोळी हणमत भाट पंडित काळे शिवाजी भाट बापूसाहेब गंगधर पारस भाट रामचंद्र पाटील रामप्रसाद भाट संदीप गावडे दीपक भाट देवाप्पा पुजारी गजानन भाट विराजसिंह यादव उत्तम भाट प्रशांत चुडमुंगे बुधाजी भाट विनायक काळे संभाजी भाट विशाल भाट तानाजी बाबर लालासो गावडे धनाजी गावडे प्रसाद यादव गुरु भाट करण भाट अभिषेक भाट प्रफुल कोळी रोहित भाट तेजस भाट तुषार भाट केतन चव्हाण सुभाष माने राजेंद्र पवार अजित देशमुख नरेंद्र माने विवेक फल्ले यांच्यासह श्रीराम भक्त व भाविकांनी हा धार्मिक सोहळा पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले

# हा मोदी आहे, जो संविधानाला समर्पित आहे; तो ना घाबरतो, ना झुकतो!



**पाटणा :** सध्या संपूर्ण देशभरात लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. राजकीय पक्षांकडून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जात आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याही सभांचा धडाका सुरु आहे. त्यांनी संविधानावरुन केलेल्या वक्तव्यामुळे काँग्रसने त्यांच्यावर टीकांचा भडीमार केला. या टीकांना आता पंतप्रधान मोदी यांनी चोख प्रत्युत्तर दिलं आहे. आज बिहारमध्ये निवडणूक सभांना संबोधित करताना मोदींनी काँग्रेसवर बोचऱ्या शब्दांत हल्ला चढवला.

काँग्रेससह अनेक विरोधी पक्ष संविधान बदलण्याचा आरोप करत भाजपला निशाणा करत होते. यावर 'खुद्द बाबासाहेब आंबेडकर आले तरी ते संविधान संपवू शकत नाहीत', असं पंतप्रधान म्हणाले होते. यावरुनही मोदींना विरोधकांनी लक्ष्य केले. यावर मोदींनी आपल्या पूर्णिया आणि गया येथील सभेत संविधानाच्या मुद्द्यावर विरोधकांना पूर्णपणे घेरले.

पंतप्रधान मोदी म्हणाले, संविधानाच्या नावाखाली जे लोक आम्हाला रात्रंदिवस शिव्या देत आहेत, त्यांच्या हातात स्वातंत्र्यानंतरही आतापर्यंत सत्ता होती. मात्र, बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान जम्मू-काश्मीरमध्ये लागू करण्याची त्यांची हिंमत नव्हती. तेथे बाबा साहेबांचे संविधान लागू होत नव्हते. हा मोदी आहे, जो संविधानाला समर्पित आहे. आज जम्मू-काश्मीरमध्येही आपले संविधान मोठ्या थाटात लागू झाले. पुढे सीएएला विरोध करणाऱ्यांना इशारा देत मोदी म्हणाले, हा मोदी आहे, ना घाबरतो, ना झुकतो.

### त्यांचे मनसुबे यशस्वी होणार नाहीत

**पूर्णियातील सभेला संबोधित करताना मोदींनी आणीबाणीवरही भाष्य केले. ते म्हणाले, संविधान रद्द करण्याचे आणि संविधान ओलीस ठेवण्याचे काम या लोकांनी केले होते. सत्ता आणि सरकार एकाच कुटुंबाच्या हाती असावे, असे ज्यांना वाटते, त्यांच्या डोळ्यात संविधान खुपते. एवढेच नाही तर, या लोकांनी आता घटनात्मक व्यवस्थेनुसार घेतल्या जात असलेल्या निवडणुकांचे निकाल नाकारण्याची धमकी द्यायलाही सुरुवात केली आहे. मात्र त्यांचे मनसुबे यशस्वी होणार नाहीत. संविधान हे दलित, मागास आणि आदिवासींची शक्ती बनून कायम राहावे, यासाठी आपण सर्वांनी एकजुटीने उभे रहायचे आहे, असेही मोदी यांनी म्हटले आहे.**

# छत्तीसगडमध्ये २९ नक्षलवादी ठार

## त्यांचा नेताही मारला गेला: बीएसएफ इन्स्पेक्टर, २ डीआरजी जवान जखमी



**कांकेर :** छत्तीसगडमधील कांकेर जिल्ह्यातील माड भागात पोलिसांनी नक्षलवादी नेता शंकर रावसह १८ नक्षलवाद्यांना ठार केले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, २९ नक्षलवादी मारले गेल्याचे सांगण्यात येत आहे. या चकमकीत बीएसएफचे निरीक्षक रमेश चौधरी यांच्यासह तीन जवान जखमी झाले आहेत. त्यापैकी २ डीआरजीचे आहेत. जखमी जवानांना आणण्यासाठी हेलिकॉप्टर पाठवण्यात आले आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून ५ एके-४७ जप्त केल्या आहेत.

लोकसभा निवडणुकीच्या वेळी ही चकमक झाली. कांकेर लोकसभेसाठी दुसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे. त्यासाठी उमेदवारी अर्जही भरण्यात आले आहेत. कांकेरमध्ये २६ एप्रिलला मतदान होणार आहे. बस्तर लोकसभेसाठी चार दिवसांनी १९ एप्रिलला मतदान होणार आहे. यासाठी मतदान पथकेही रवाना झाली आहेत.

**दोन ठार झालेल्या माओवाद्यांवर प्रत्येकी २५ लाखांचे बक्षीस**

चकमकीत मारले गेलेले शंकर राव आणि ललिता मडवी हे डीव्हीसी दर्जाचे नक्षलवादी नेते होते. या दोघांवर २५-२५ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. घटनास्थळावरून पोलिसांनी ४ स्वयंचलित शस्त्रेही जप्त केली आहेत.

कांकेरमध्ये चकमक कधी झाली?

यापूर्वी २५ फेब्रुवारी रोजी हुरातराई जंगलात नक्षलवाद्यांच्या चकमकीत ३ नक्षलवादी ठार झाले होते.

३ मार्च रोजी छोटा बेठियाच्या हिदूरमध्ये पोलीस-नक्षलवादी चकमकीत एक नक्षलवादी ठार झाला. तर बस्तरचा एक सैनिक शहीद झाला. १६ मार्चलाही चकमकीत एक नक्षलवादी ठार झाला होता. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यानही नक्षलवादी हल्ला झाला होता. ज्यामध्ये बीएसएफचे २ जवान शहीद झाले होते.

नक्षलवाद्यांची छायाचित्रे असलेली पोस्टर्स चिकटवली. प्रत्येक गावात नक्षलवाद्यांची पोस्टर्स दिसत आहेत.येथे कबीरधाम जिल्ह्यात नक्षलवाद्यांची माहिती देणाऱ्या आणि त्यांना अटक करणाऱ्याला ५ लाखांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. पुरस्कारासोबतच एसपी अभिषेक पल्लव यांनी पोलीस खात्यात सरकारी नोकरीची घोषणाही केली आहे. माहिती देण्यासाठी ७८९८८ १५३९९ हा हेल्पलाइन क्रमांकही जारी करण्यात आला आहे. त्यासाठी सैनिक प्रत्येक गावात भिंतींवर नक्षलवाद्यांचे चित्र असलेले पोस्टर लावत आहेत.

# घर, भाकरीची स्वप्ने दाखवून काँग्रेसने गरीबांना फसविले

## बिहारमधील प्रचारसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हल्लाबोल

**नवी दिल्ली, :** ग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांनी अनेक दशके गरिबांना घरे आणि भाकरीची केवळ स्वप्ने दाखवली, तर रालोआ सरकारने चार कोटी गरीबांना कायमस्वरूपी घरे दिली. दलित, मागासवर्गीय आणि आदिवासींच्या नावावर काँग्रेस आणि राजदने केवळ स्वत:चे राजकीय हित साधले, तर 'रालोआ' ने दलित, मागास आणि वंचितांना हक्क आणि सन्मानाचे जीवन दिले आहे. ज्यांना एका कुटुंबाच्या हातात सत्ता ठेवायची आहे, त्यांना संविधान खटकते, म्हणूनच त्यांचे मनसुबे यशस्वी होऊ नयेत, यासाठी एकजूट दाखवून समृद्ध भारतासाठी भाजपा आघाडीला विजयी करा, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहारमध्ये गया व पूर्णिया येथील विशाल प्रचार सभांमध्ये बोलताना केले.

तुमची स्वप्ने हाच आमचा संकल्प आहे, म्हणूनच गेल्या दहा वर्षात अनेक दशकांच्या समस्या सोडविण्यात मोदी सरकार यशस्वी ठरले, असेही ते म्हणाले. भारत हा अनेक भाषा, बोली, चालीरीती, पोशाख, अनेक धर्म आणि पंथांनी नटलेला देश आहे, अशा परिस्थितीत संविधान हीच देशाच्या उज्ज्वल भविष्याची पवित्र व्यवस्था आहे. भारत समृद्ध व्हावा, असे भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न होते, पण देशावर अनेक दशके राज्य करणाऱ्या काँग्रेसने संधी आणि देशाचा वेळ गमावला, अशा शब्दांत काँग्रेसवर टीका करताना ते म्हणाले, तुमचा सेवक असलेल्या मोदींनी २५ कोटी देशवासीयांना गरिबीतून बाहेर काढले.

पंतप्रधान म्हणाले की, मोदींचे हेच हमीपत्र येत्या पाच वर्षासाठी अपडेट झाले आहे. गरिबांसाठी तीन कोटी पक्की घरे बांधणार, पाच वर्षे मोफत धान्य देणार, ७० वर्षावरील प्रत्येक व्यक्तीला पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळणार, शेतकरी सन्मान निधी भविष्यातही सुरू राहील, ही मोदींची हमी आहे. भाजपाच्या जाहीरनाम्यात समाजातील प्रत्येक घटक आणि क्षेत्रासाठी विकासाचा ठोस आराखडा तयार करण्यात आला आहे. गेल्या दहा वर्षात देशातील महिला बचत गटांनी एक क्रांती सुरू केली, पण त्याची चर्चा क्वचितच होते. देशातील दहा कोटी महिला स्वयं-सहायता गटांशी संबंधित आहेत. काँग्रेस सरकारच्या काळात बिहारमध्ये महिला बचत गटांना १५० कोटी रुपयांपेक्षा कमी मदत दिली जात होती, मात्र रालोआ सरकारने ४० हजार कोटी रुपयांहून अधिक मदत दिली, असे ते म्हणाले. या प्रयत्नामुळे एकट्या बिहारमध्ये १२ लाखांहून अधिक महिला लखपती दीदी झाल्या आहेत. आता भाजपाने देशातील तीन कोटी महिलांना लखपती दीदी बनवण्याची मोहीम सुरू केली असून त्याचा बिहारच्या महिलांना देखील मोठा फायदा होणार आहे, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली.

देशातील सर्वच ठिकाणच्या विकासासाठी मोदी सरकार कटिबद्ध आहे. भारतातील वारसा जागतिक वारसा नकाशावर नेण्याचा संकल्प भाजपाने आपल्या जाहीरनाम्यात केला असून या उपक्रमामुळे मोठ्या संख्येने जागतिक पर्यटक भारतात येतील आणि संपूर्ण भारतातील पर्यटन स्थळांना फायदा होईल. जनतेचा उत्साह आज मोदी सरकारच्या विकासाचे प्रतिबिंब ठरला आहे. पण आतापर्यंत झालेला विकास हा केवळ ट्रेलर आहे, देशाला अजून खूप मोठा पल्ला गाठायचा आहे, तुमचे प्रत्येक स्वप्न हा मोदींचा संकल्प ठरेल असेही ते म्हणाले.

ही निवडणूक पक्षाची नसून देशाची निवडणूक असल्याचे पंतप्रधान म्हणाले. एकीकडे देशाच्या संस्कृतीचा अभिमान बाळगणारी रालोआ आघाडी आहे आणि दुसरीकडे देशाच्या श्रद्धेला तडा देणारे लोक आहेत. उद्या, बुधवारी रामनवमीचा पवित्र सण आहे, सूर्यकिरणे उद्या अयोध्येत रामलल्लाच्या मस्तकावर विशेष अभिषेक करतील, पण अहंकारी आघाडीच्या नेत्यांना राम मंदिरामुळेही त्रास होत आहे. प्रभू रामाच्या अस्तित्वावर प्रश्न उपस्थित करणारे लोक आज राम मंदिरासाठी अपवित्र भाषा वापरण्याच्या खालच्या पातळीवर गेले आहेत. अहंकारी आघाडीच्या नेत्यांनी एका समाजाच्या तुष्टीकरणासाठी प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाचे निमंत्रण नाकारले. ही आपल्या देशाची मूल्ये आणि परंपरा नाहीत. या अहंकारी आघाडीचा एक नेता आणि काँग्रेसचा राजपुत्र उघडपणे हिंदू धर्माची शक्ती नष्ट करण्याची धमकी देतात. आज नवरात्रीचा पवित्र काळ असून भारत हा शक्तीचा उपासक आहे, या शक्तीचा कोणीही नाश करू शकत नाहीच, उलट सत्ता नष्ट करण्यासाठी निघालेल्यांचा नाश होणार असा इशाराही पंतप्रधानांनी दिला. इंडी आघाडीतील इतर सहकारी सनातन धर्माला डेंग्यू-मलेरिया म्हणतात. हा सनातन धर्माचा, आपल्या ऋषींचा आणि पूर्वजांचा अपमान आहे. इंडी आघाडी एकही जागा जिंकण्यास सक्षम नाही. या अहंकारी आघाडीकडे दूरदृष्टी नाहीच, आणि कोणताही विश्वासही नाही असे सांगत त्यांनी बिहारमधील इंडी आघाडीचा घटक असलेल्या 'राजद' ला लक्ष्य केले. बिहारमधील इंडी आघाडीचे पक्ष नितीश कुमारांची कामे दाखवून मते मागतात आणि नितीश - केंद्र सरकारच्या विकासकामांचे श्रेय घेतात. बिहारवर वर्षानुवर्षे सत्ता असूनही, राजद आपल्या कृतींवर चर्चा करण्यास सक्षम नाही. बिहारमधील जंगलराजचा सर्वात मोठा चेहरा, भ्रष्टाचाराचे दुसरे नाव आणि विनाशाचा सर्वात मोठा गुन्हेगार म्हणजे राजद आहे, अशा शब्दांत त्यांनी राजदला फटकारले.

# नरेंद्र मोदींची पोस्ट चर्चेत!

## 'अपयशाने खचून जायचें नसते, भारतात संधींची कमतरता नाही''

**दिल्ली :** केंद्रीय लोकसेवा आयोगाचे अर्थात युपीएससी चे निकाल जाहीर झाले आहेत. या निकालांमध्ये आदित्य श्रीवास्तव देशात पहिला तर अनिमेश प्रधान देशात दुसरा आला आहे. यंदा युपीएससीच्या निकालात दोन मुलांनी उत्तम कामगिरी करत बाजी मारली आहे. मात्र अनेक मुलं अशीही आहेत ज्यांना या परीक्षेत अपयश आलं आहे. अशा मुलांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी एक खास पोस्ट केली आहे. लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी हे प्रचारात व्यग्र आहेत. तसंच त्यांच्या रॅली आणि सभाही होत आहेत. तरीही अपयश आलेल्या मुलांसाठी नरेंद्र मोदींनी खास पोस्ट लिहिली आहे.

काय आहे नरेंद्र मोदींची पोस्ट?

''युपीएससी च्या परीक्षेत ज्यांना यश आले नाही त्या सगळ्यांना मी सांगू इच्छितो की अपयश हा काही एखादा धक्का किंवा आघात नाही. अपयशाने खचून जायचं नसतं. एकदा आलेलं अपयश हे काही एखादा प्रवास जसा संपतो तसं नाही. जोमाने पुन्हा तयारीला लागा. आपला भारत देश हा संधींची कमतरता नसलेला देश आहे. या संधी इतक्या मोठ्या प्रमाणावर आहेत की ज्यामुळे तुमच्या कर्तृत्वाला वेगळी झळाळी मिळू शकते. काय काय शक्यता आहेत? त्यांचा विचार करा आणि पुढे जा. ज्यांना अपयश आले आहे, त्यांना पुढच्या संधीचे सोने करण्यासाठी माझ्या शुभेच्छा'' या आशयाची पोस्ट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लिहिली आहे. जी चांगलीच चर्चेत आहे.

# ७ हेलिकॉप्टर, १५ हजारांहून अधिक जवान, गडचिरोलीत युद्ध क्षेत्राचा भास व्हावा..

**गडचिरोली :** युद्ध क्षेत्राचा भास व्हावा अशी स्थिती सद्या गडचिरोलीच्या अतिसंवेदनशील भागात दिसून येत आहे. नक्षल्यांच्या सावटाखाली पार पडत असलेल्या लोकसभा निवडणुकीसाठी प्रशासनाने विशेष तयारी केली असून अतिसंवेदनशील भागात मतदान यंत्र आणि कर्मचारी नेण्यासाठी वायुसेनेच्या ७ हेलिकॉप्टरची मदत घेतली जात आहे. नक्षल कारवायांवर अंकुश ठेवण्यासाठी विविध दलातील तब्बल १५ हजारांहून अधिक पोलीस जवान तैनात करण्यात आले आहेत.

नक्षलवाद्यांच्या दहशतीमुळे निवडणूक प्रक्रिया राबविण्याच्या दृष्टीने राज्यात सर्वाधिक धोकादायक जिल्हा म्हणून गडचिरोलीची ओळख आहे. त्यामुळे निवडणुकीदरम्यान प्रशासनाला इतर जिल्ह्याच्या तुलनेत विशेष तयारी करावी लागते. १९ एप्रिल रोजी जिल्ह्यात लोकसभेकरिता मतदान होणार आहे. त्यासाठी पोलीस प्रशासनाने सहा महिन्यांपासून तयारी चालवली होती. अतिसंवेदनशील समजल्या जाणाऱ्या भामरागड आणि एटापल्ली तालुक्यातील वांगेतुरी, गर्देवाडा, पिपली बुर्गी, मन्नेराजाराम येथे वर्षभरात ४ नवे पोलीस मदत केंद्र उभारण्यात आले. एकेकाळी ही गावे नक्षल्यांचे नंदनवन समजली जायची. आता नक्षल्यांची चांगलीच कोंडी झाली आहे. सोबतच दुर्गम भागात मोठ्या प्रमाणात झालेले रस्ते बांधकाम, यामुळेदेखील नक्षलवाद्यांवर अंकुश ठेवण्यात पोलिसांना बऱ्यापैकी यश आले आहे.

निवडणुकांचा पूर्वानुभव लक्षात घेता पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून अतिसंवेदनशील आणि दुर्गम भागात हेलिकॉप्टरच्या साहाय्याने १६ एप्रिलपासूनच मतदान यंत्र आणि कर्मचारी पोहचवण्यात येत आहेत. त्यासाठी स्थानिक सी ६० जवानांच्या दिमतीला विविध दलातील १५ हजारहून अधिक पोलीस वायुसेनेचे ७ हेलिकॉप्टर देण्यात आले आहेत. आज, मंगळवारी अतिसंवेदनशील ६८ मतदान केंद्रांवरील ७२ पथकाच्या २९५ मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदान यंत्रासह बेसकॅम्पवर सुरक्षितपणे पोहोचवण्यात आले. पुढचे दोन आणि निवडणुकीनंतर दोन दिवस सुरक्षितपणे मतदान पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणा सतर्क झाली असून जास्तीत जास्त मतदान व्हावे यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी सांगितले.

**नक्षल्यांच्या हालचालींवर नजर**

मागील वेळेस लोकसभा निवडणुकीदरम्यान नक्षल्यांनी २२ हिसंक कारवाया केल्या. यात सात लहान-मोठे बॉम्बस्फोट केले होते. काही ठिकाणी चकमकी उडाल्या होत्या. १ मे रोजी नक्षल्यांनी घडवून आणलेल्या भूसुरुंगस्फोटात १५ जवान शहीद झाले होते. त्यांनतर नक्षलवाद्यांविरोधात पोलिसांनी केलेल्या कारवायांमुळे ही चळवळ खिळखिळी झाली. पण, काही भागात धोका कायम असल्याने पोलीस यंत्रणा नक्षल्यांच्या हालचालींवर नजर ठेऊन आहे.

## लोकसभा निवडणुकीच्या आधी कांकोरमध्ये १८ नक्षलींचा खात्मा

**छत्तीसगड,:** देशात १९ एप्रिलच्या दिवशी लोकसभा निवडणुकीचा पहिला टप्पा पार पडणार आहे. त्याआधी छत्तीसगडच्या कांकोरमध्ये सीआरपीएफचे जवान आणि नक्षली यांच्यात चकमक झाली. या चकमकीत १८ नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे. छोटे बेठीया ठाण्याच्या माड भागात ही चकमक सुरु आहे. यात आत्तापर्यंत १८ नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे. तीन जवान जखमी झाले आहेत अशी माहिती समोर आली आहे.

कांकोर येथे चकमक झाली आहे. आम्ही नक्षलवाद्यांच्या विरोधात जवानांनी मोहीम सुरु केली आहे. नक्षलवाद्यांच्या विरोधात जी कारवाई आम्ही केली त्यात आत्तापर्यंत १८ नक्षल्यांचा खात्मा केला आहे.

# ममता बॅनर्जी यांच्याबद्दल आक्षेपार्ह आणि अनादरजनक वक्तव्याबाबत एआयटीएमसीच्या तक्रारीवरून भाजप नेते दिलीप घोष यांना नोटीस

आयएनसीच्या सुप्रिया श्रीनाते आणि सुरजेवाला यांना, अनुक्रमे कंगना राणावत आणि हेमा मालिनी यांच्या विरोधात अपमानास्पद टिप्पणी केल्याबद्दल भाजपने केलेल्या तक्रारीवरून नोटीस.

द्रमुक नेते अनिथा आर राधाकृष्णन यांनी नरेंद्र मोदींबद्दल केलेल्या टीकेविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला.

प्रकाशकाचे नाव न देता दिल्ली महानगरपालिका आयोग क्षेत्रातील जाहिरातफलकांवर निनावी जाहिरातींच्या विरोधात आप च्या तक्रारीवरून, कायद्यातील तफावत दूर करणारी मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली आहेत. होर्डिंग्जचा समावेश करून विद्यमान कायद्यातील



'पॅम्फलेट आणि पोस्टर' च्या अर्थाला अधिक व्यापकता देऊन, प्रचार संप्रेषणातील जबाबदारी आणि पारदर्शकता याची खातरजमा करण्याकरिता सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत ज्यात होर्डिंगसह मुद्रित निवडणूक-संबंधित सामग्रीवर मुद्रक आणि प्रकाशकांची स्पष्ट ओळख अनिवार्य आहे.

आयएनसीच्या तक्रारीवरून, दिल्लीतील महापालिका अधिकाऱ्यांना विविध महाविद्यालयांतील स्टार प्रचारकांचे कट आउट काढण्याचे निर्देश जारी करण्यात आले आहेत.

उल्लंघनाबाबत आयोगाच्या सी व्हिजिल, पोर्टलवर नागरिकांकडून एकूण २,६८,०८० तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत. यापैकी २,६७,७६२ प्रकरणांमध्ये कारवाई करण्यात आली असून ९२म प्रकरणात सरासरी १०० मिनिटांपेक्षा कमी कालावधीत निपटारा करण्यात आला. सी व्हिजिल च्या कार्यक्षमतेमुळे, बेकायदेशीर होर्डिंग्ज, मालमत्तेचे विद्रुपीकरण, अनुज्ञेय वेळेहून अधिक काळ प्रचार, परवानगी पेक्षा जास्त वाहने तैनात करणे यामध्ये लक्षणीय घट झाली आहे.

# लोकसभेच्या तोंडावर काँग्रेसला धक्का! हेमा मालिनी यांच्यावरील वक्तव्य भोवले, आयोगाची कारवाई

**नवी दिल्ली, :** लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. खासदार हेमा मालिनी यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी निवडणूक आयोगाने मोठा निर्णय घेतला आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रणदीप सुरजेवाला यांच्यावर निवडणूक आयोगाने ४८ तासांची बंदी घातली आहे. सुरजेवाला पुढील ४८ तास कोणत्याही प्रकारच्या निवडणूक कार्यात सहभागी होऊ शकणार नाहीत. सुरजेवाला यांना निवडणूक प्रचारापासूनही दूर राहावे लागणार आहे. रणदीप सिंग सुरजेवाला आज संध्याकाळी ६ वाजल्यापासून पुढील ४८ तास कुठल्याही प्रकारचा प्रचार अथवा माध्यमांशी संवाद साधू शकणार नाहीत.



रणदीप सिंग सुरजेवाला हे पहिले नेते आहेत, ज्यांच्यावर निवडणूक आयोगाने २०२४ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान कारवाई केली आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या मोठ्या संख्येने नेत्यांवर निवडणूक आयोगाने कारवाई केली होती.

### सुरजेवाला यांचे स्पष्टीकरण

**कारवाईनंतर सुरजेवाला यांनी याप्रकरणी स्पष्टीकरण देत भाजपवर मोठे आरोप केले. ते म्हणाले की, भाजपच्या आयटी सेलला खोट्या आणि विकृत गोष्टी पसरवण्याची सवय लागली आहे, जेणेकरून ते मोदी सरकारची युवकविरोधी, शेतकरी विरोधी, गरीब विरोधी धोरणे आणि अपयशावरुन लक्ष भरकटवू शकतील. माझा पूर्ण व्हिडिओ ऐका – मी म्हणालो, ''आम्ही हेमा मालिनी जींचा खूप आदर करतो. कारण त्यांचे लग्न धर्मेंद्रजींशी झाले आहे, ती आमची सून आहे.''**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि राज्यसभा खासदार रणदीप सुरजेवाला यांनी हरियाणातील कैथलमधील फराळ गावात जाहीर सभेला संबोधित करताना म्हटले, ''लोक आम्हाला आमदार आणि खासदार का बनवत नाही? कारण आम्ही हेमा मालनी नाही '

**खर्गे यांनाही निवडणूक आयोगाचे पत्र**

**केवळ रणदीप सिंग सुरजेवाला यांनाच नाही, तर सध्याच्या प्रकरणात निवडणूक आयोगाने काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनाही पत्र लिहिले होते, ज्यात त्यांना त्यांच्या पक्षाच्या सर्व नेत्यांना निवडणूक आचारसंहितेबाबत माहिती देण्यास सांगण्यात आले होते. पक्षाच्या नेत्या सुप्रिया श्रीनेत यांनीही कंगना रणौतवर वादग्रस्त विधान केले होते. या सर्व पार्श्वभूमीवर आयोगाने काँग्रेस अध्यक्षांना पत्र पाठवले होते.**